# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 159 |
| स्थळ | : | प्रशासकीय इमारत सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422 222 |
| वार व दिनांक | : | शुक्रवार, दिनांक : 2 डिसेंबर 2016 |
| वेळ | : | सकाळी 11.30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## कार्यवृत्त

159 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, शुक्रवार, दिनांक 2 डिसेंबर, 2016 रोजी सकाळी 11.30 वाजता, प्रशासकीय इमारत सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.प्रा.डॉ. दिलीप म्हैसेकर, प्रभारी कुलगुरु, — अध्यक्ष
2. मा. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग,यचममुवि,नाशिक — सदस्य
3. मा. मा.डॉ.व्ही.एल.माहेश्वरी, जळगाव — सदस्य
4. मा. डॉ. एस.ए. ठोंबरे. औरंगाबाद — सदस्य
5. डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव — सचिव
6. मा.प्रभारी वित्त अधिकारी,य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक — निमंत्रित सदस्य
7. मा. परीक्षा नियंत्रक, य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक — निमंत्रित सदस्य

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

1. मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई — सदस्य
2. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
3. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
4. मा.संचालक,व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी — सदस्य
5. मा.संचालक,उच्च शिक्षण,पुणे — सदस्य
6. मा.श्री.हेमंत टकले, मुंबई — सदस्य
7. मा. श्री. ज्ञानदेव नाठे, सहसंचालक,तंत्रशिक्षण ,नाशिक — सदस्य
8. मा.डॉ.डब्ल्यु.एन.गाडे,कुलगुरू,पुणे — सदस्य
9. मा.डॉ.वंदी व्यंकटेशवारलू,कुलगुरू,परभणी — सदस्य
10. मा. डॉ. विद्या येरावडेकर, पुणे — सदस्य
11. मा. प्रा. कपिल कुमार, नवी दिल्ली — सदस्य
12. मा.श्री.उल्हास एन. गवळी, औरंगाबाद — सदस्य
13. मा. डॉ. आर.सेशा अय्यर, मुंबई — सदस्य

व्यवस्थापन मंडळ बैठकीसाठी सहा सदस्य संख्या आवश्यक असल्याने उपस्थित सदस्यांनी सदरील बैठकीचे कार्यवृत्त इतर सर्व अनुपस्थित सदस्यांना वितरीत करून (By Circulation) त्यांचे मत घ्यावे असे ठरले.

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 159.1.0 | | स्वागत<br>मा.कुलसचिव यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले, व बैठकीस सुरवात करण्यात आली. |
| 159.2.0 | 159.2.1 | दि. 21 सप्टेंबर, 2016 रोजी झालेल्या 157 व 158 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून त्यावर मा.कुलगुरू यांनी स्वाक्षरी करणे<br>व्य.मं.ठराव: दि. 21 जून, 2016 रोजी झालेल्या 157 व 158 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्तांत वाचून कायम करुन त्यावर मा.कुलगुरु यांनी स्वाक्षरी केली |
| | 159.2.2<br>वित्त विभाग | दि. 21 सप्टेंबर, 2016 रोजी झालेल्या 157 व 158 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल |

| | | |
|---|---|---|
| | | व्य.मं.ठराव - दि. 21 सप्टेंबर, 2016 रोजी झालेल्या 157 व 158 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>158 व्या व्यवस्थापन मंडळाच्या विषय क्र 158.5.02नुसार विद्यापीठास आयकर खात्याकडून प्राप्त झालेल्या नोटीशीबाबत झालेल्या ठरावानुसार मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने पुणे येथील निवृत्त आयकर आयुक्त श्री.तेजींदर सिंग यांचेशी संपर्क साधण्यात आला. परंतु त्यांनी हे काम स्विकारण्यास असमर्थता व्यक्त केली.त्यामुळे प्रभारी वित्त अधिकारी यांनी श्री.प्रमोद शिंगोटे, श्री.चंद्रशेखर चितळे वरिष्ठ आयकर सल्लागार यांची नावे सुचविली त्यास मान्यता देऊन त्यांच्याशी संपर्क करून पुढील कार्यवाही करण्यास तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक येथे असल्यामुळे यासंदर्भात नाशिक येथील श्री.हितेश टाटीया, सनदी लेखापाल यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सल्ला घ्यावा यासाठी मान्यता देण्यात आली. |
| | 159.3.1<br>कुलसचिव कार्यालय | कुलगुरू निवड प्रक्रिया जाहीरात प्रसिध्दी खर्च- अंदाजे रु. 23 लाख, शोध समिती अध्यक्ष सदस्य यांचा प्रवास,निवास व मानधनखर्च, नोडल अधिकारी व Supporting Staff मोबदला अंदाजे रु. 6 लाख व इतर खर्च रु. 1 लाख असे एकूण अंदाजे रु. 30 लाख खर्चास मान्यता देणेबाबतची बाब विचारार्थ<br>व्य.मं.ठराव-कुलगुरू निवड प्रक्रिया जाहीरात प्रसिध्दी खर्च रु. 23 लाख, शोध समिती अध्यक्ष सदस्य यांचा प्रवास,निवास खर्च तसेच नोडल अधिकारी व Supporting Staff मोबदला अंदाजे रु. 6 लाख व इतर खर्च रु.1 लाख असे एकूण अंदाजे रु.30लाख खर्चास मान्यता देण्यात आली.तसेच जाहीरातीसाठी येणा-या खर्चाचे देयक संबंधीतांना अदा करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 159.3.2<br>आस्थापना कक्ष | विद्यापीठाच्या विभागीय केंद्रावरील संचालक नेमणूक व मानधनाबाबत<br>व्य.मं.ठराव – विद्यापीठाच्या विभागीय केंद्रावरील संचालक नेमणूका व मानधानाबाबत टिपणीत उल्लेख केल्याप्रमाणे<br>१)विद्यापीठाच्या परिनियम २ (२००७) मधील तरतूदीनुसार By Invitationपदे भरण्यास<br>किंवा<br>२)विद्यापीठातील शिक्षक /अधिकारी यांना प्रतिनियुक्तीने विभागीय संचालकपदी नियुक्ती करण्यास तसेच त्यांचे वेतन निश्चित करण्यात मान्यता देण्यात आली. |
| | 159.3.3<br>आरोग्यविज्ञान विद्याशाखा | विद्यापीठातील नियमित शिक्षक, अधिकारी,कर्मचारी यांना आरोग्य विषयक सेवा पुरविण्यासाठी श्री गुरूजी रुग्णालय,नाशिक यांचेशी दि. 21 सप्टेंबर 2015 ते दि. 31 ऑगस्ट 2016 या कालावधीत केलेल्या कराराची मुदत दि. 31 मार्च 2017 पर्यंत वाढविण्याची बाब विचारार्थ<br>व्य.मं.ठराव – विद्यापीठातील नियमित शिक्षक, अधिकारी,कर्मचारी यांना आरोग्य विषयक सेवा पुरविण्यासाठी श्री गुरूजी रुग्णालय,नाशिक यांचेशी करार करण्यात आला, सदर कराराची मुदत दि. 31 ऑगस्ट 2016 रोजी संपृष्टात आली होती. सदरील करार दि.1 सप्टेंबर 2016 दि. 31 मार्च 2017, असा सहा महिन्याकरिता मागील वर्षी केलेल्या करारातील अटी व शर्तीनुसार वाढविण्यास मान्यता देण्यात आली |
| | 159.3.4<br>परीक्षा विभाग | महाराष्ट्र ज्ञान मंडळ (MKCL),पुणे व विद्यापीठ इ-सुविधा देण्याबाबत केलेल्या कराराची मुदत संपृष्टात आल्याबाबत.<br>व्य.मं.ठराव – महाराष्ट्र ज्ञान मंडळ (MKCL),पुणे व विद्यापीठ इ-सुविधा देण्याबाबत केलेल्या कराराची मुदत पुढील पर्यायी व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत वाढविण्यास तसेच याबाबतचा सर्व Data परीक्षा विभागाने उपलब्ध करून घ्यावा असे ठरले. |
| | 159.3.5<br>विधीकक्ष | नागपूर,औरंगाबाद,मुंबई खंडपीठ तसेच इतर ठिकाणी वकीलांचे पॅनल करणेबाबत व त्यांना देण्यात येणा-या फीबाबत<br>व्य.मं.ठराव – नागपूर,औरंगाबाद,मुंबई विद्यापीठ तसेच इतर ठिकाणी वकीलांचे पॅनल करणेबाबत,महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ.नाशिक यांनी मान्य केलेल्या वकीलांचे पॅनल तयार करण्यास व त्यानुसार मानधन देण्यास,तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील नागपूर,औरंगाबाद,मुंबई खंडपीठ येथे याअगोदर नेमलेले वकील यांचाही पॅनलमध्ये समावेश करण्यास |

| | | |
|---|---|---|
| | | मान्यता देण्यात आली. (सोबत यादी जोडली आहे.) |
| | 159.3.6<br>परीक्षा कक्ष | 23 वा पदवीदान सोहळा डी.लिट.देण्याबाबतची बाब विचारार्थ<br>**व्य.मं.ठराव – विद्यापीठाचा २३ वा पदवीदान सोहळा दि.१२ जे २१ जानेवारी २०१७ याकालावधीत आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.डी.लिट. देण्याबाबत विद्यापीठ परिनियम ४ नुसार कार्यवाही करण्यात येईल असे मा.कुलगुरूंनी सांगितले.** |
| | 159.3.7<br>परीक्षा कक्ष | पदवी प्रमाणपत्र,गुणपत्रिका वितरणाबाबत कार्यपध्दती तयार करण्याची बाब विचारार्थ<br>व्य.मं.ठराव –गुणपत्रिका व इतर परीक्षेची विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे प्रिंटरमार्फत परस्पर विद्यार्थ्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर न पाठविता विभागीय केंद्रामार्फत अभ्यासकेंद्रावर पाठविण्यात यावीत. तसेच पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठातून तपासून विभागीय केंद्रांना वितरणाकरिता पाठविण्यात यावी.याकरिता वितरणाचे कार्यक्रम घेण्यास व त्यासाठी आवश्यक निधी मा.कुलगुरू यांनी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. |

सचिव
व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष
व्यवस्थापन मंडळ